# आध्यात्मिक सशक्तिकरणाद्वारे स्वर्णिम युगात प्रवेश...

स्वर्णिम युग एक असा काळ होता जेव्हा विश्वात सम्पूर्ण सुख शांतिचे साम्राज्य होते आणि हि सृष्टि फुलांचा बगीचा म्हटली जात असे. प्रकृति सुध्दा सतोप्रधान होती आणि येथे कोणत्याही प्रकारचे प्राकृतिक प्रकोप नव्हते. सर्व मनुष्य सतोप्रधान व दैवीगुण सम्पन्न होते आणि आनंद व खुशीने जीवन व्यतीत करीत होते. त्यावेळी या जगाला स्वर्ग म्हटले जाई. त्या विश्वात समृध्दि, सुख आणि शांतिचे मुख्य कारण होते कि त्या काळी राजा व प्रजा सर्वजण पवित्र व श्रेष्ठाचारी होते.

त्या स्वर्णिम संसाराच्या तुलनेत आजचा मनुष्य विकारी, दुःखी व अशान्त बनला आहे व हा संसार रौरव नर्क झाला आहे. या कलियुगी जगातुन निघून त्या स्वर्गीक सतयुगी जगात जाण्याची इच्छा कोणाला बरे होणार नाही? सर्व मनुष्य पुकारतात कि हे प्रभु, आम्हाला दुःख व अशांति पासून सोडव व मुक्तिधाम व स्वर्गात घेऊन चल. त्या सुखमय स्वर्गात जाण्याचा उपाय आहे -''आध्यात्कि सशक्तिकरण'' मनात अनेक संकल्प उत्पन्न होतात, ज्यांची गति तीव्र असते. या संकल्पांना बुध्दिद्वारे नियंत्रित केले जाऊ शकते.

साधारणतः हे मन मनुष्याला खूप परेशान करते. म्हणून जर मन व बुध्दिचे दिव्यीकरण केले व आध्यात्मिक ज्ञानाच्या आधारे यांना योग्य दिशा प्रदान केली तर हे शक्तीशाली बनून मनुष्याला स्वर्णिम युगाकडे घेऊन जातील. सकारात्मक चिंतन करणारा मनुष्य जीवनातील प्राप्ति बघून सतत खुश राहतो. या उलट नकारात्मक चिंतन करणारा जीवनातील अप्राप्ति बघून सतत दुःखी राहतो.

राजयोगाच्या अभ्यासाने मनुष्यात्म्याचा संबंध सर्वशक्तिवान पतित पावन, पारलौकिक परमपिता परमात्मा ''शिव'' बरोबर जुटतो. यामुळे माणसाला विकारांवर विजय प्राप्त करण्याचे मनोबळ प्राप्त होते. विकर्म विनाश झाल्याने तो हल्केपणाचा अनुभव करतो. अशाच प्रकारे दिव्य गुणांच्या धारणेने मनुष्य सूर्यमुखी फुलासमान सतत हर्षित राहतो. त्याचा चेहरा बुध्दियोग सदा सूर्या कडे म्हणजे ज्ञान सुर्य परमात्म्या कडे असते. जीवनवात मानवीय मुल्य - स्नेह, संतोष, गम्भीरता, विनम्रता, सहनशीलता, इ. दैवी गुणांची धारणा व आदरयुक्त दिव्य व्यवहारच माणसाला सर्वांचा प्रिय बनविते. अशा प्रकारे बरील व अन्य साधनांद्वारे प्रत्येक व्यक्ति आपले आध्यात्मिक सशक्तिकरण करु शकतो व नव्या स्वर्णिम युगात जाण्याचा आपला ईश्वीय जन्मसिध्द अधिकार प्राप्त करु शकतो. प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या कोणत्याही शाखेत या विषयी मोफत प्रशिक्षण दिले जाते.

**- ब्रह्माकुमारीज् वार्ता फिचर्स**

**www.bkvarta.com**